# पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक्स् असोसिएशन लि. पुणे
## ४९/१ ऋतुरंग संकुल सी-डी बिल्डिंग, अरण्येश्वर कॉर्नर, पर्वती, पुणे ४११००९

**भगिनी निवेदिता सहकारी बँक मर्यादित पुणे** या प्रथितयश बँकेस पुणे व अहमदनगर शाखेकरीता लेखनिक, अधिकारी, मॅनेजर (फक्त चार्टर्ड अकौंटंट) व स्वीपर मेसेंजर या सर्व पदांकरीता **केवळ महिला उमेदवारांची** भरती करावयाची आहे. त्यासाठी खालील निकषांप्रमाणे पात्रता असलेल्या उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

१)लेखनिक पदासाठी :

**पात्रता** : मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी आवश्यक व MS_CIT /समतुल्य (equivalent certification course) परीक्षा उत्तीर्ण आवश्यक. **प्राधान्य** : JAIIB/CAIIB/GDCA/तसेच शासन मान्यताप्राप्त इतर संस्थेची बँकिंग/सहकार/कायदेविषयक पदविका, **अनुभव** : बँका/पतसंस्था/इतर वित्तीय संस्थातील कामकाजाचा अनुभव असल्यास प्राधान्य. **वयोमर्यादा** : किमान २२ वर्षे ते कमाल ३५ वर्षे. **शुल्क** : लेखीपरीक्षा शुल्क रु.११८०/- (जी.एस.टी सह)

२) अधिकारी पदासाठी :

**पात्रता** : मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी आवश्यक व संगणकीय ज्ञान MS_CIT /समतुल्य (equivalent certification course) परीक्षा उत्तीर्ण आवश्यक. **प्राधान्य** : JAIIB/CAIIB/GDCA/तसेच शासन मान्यताप्राप्त इतर संस्थेची बँकिंग/सहकार/कायदेविषयक पदविका /डी.सी.एम उत्तीर्ण. **अनुभव** : बँका किंवा इतर वित्तीय संस्थेमधील ऑफिसर/सिनीअर क्लार्क/ज्युनिअर क्लार्क या पदावर काम केल्याचा किमान ३ वर्षाचा अनुभव आवश्यक. **वयोमर्यादा** : किमान २५ वर्षे ते ३५ वर्ष व वयोमर्यादा शिथिल करण्याचे अधिकार मा.संचालक मंडळास राहतील.
**शुल्क** : लेखीपरीक्षा शुल्क रु.११८०/- (जी.एस.टी सह)

३) मॅनेजर (फक्त चार्टर्ड अकौंटंट) पदासाठी :

**पात्रता** : मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी तसेच Chartered Accountant पदवी आवश्यक व संगणकीय ज्ञान MS_CIT /समतुल्य (equivalent certification course) परीक्षा उत्तीर्ण आवश्यक. **प्राधान्य** :JAIIB/CAIIB/Diploma in Banking and Finance/Diploma in Co-operative Management/DCBM उत्तीर्ण,पदव्युतर पदवी, **अनुभव** : सहकारी बँकेत मॅनेजर पदाचा किमान ५ वर्षाचा नोकरीचा अनुभव आवश्यक. **वयोमर्यादा** : किमान ३० वर्षे ते ४० वर्ष व वयोमर्यादा शिथिल करण्याचे अधिकार मा.संचालक मंडळास राहतील.
**मुलाखत परीक्षा** : बँकेमार्फत मुलाखत घेऊन निवड करण्यात येईल.

४) स्वीपर मेसेंजर पदासाठी :

**पात्रता** : किमान शिक्षण १० वी पास, तसेच मराठी/हिंदी/इंग्रजी भाषेचे ज्ञान आवश्यक. **वयोमर्यादा** : किमान २१ वर्षे ते कमाल ३३ वर्षे. **शुल्क** : परीक्षा शुल्क रु.११८/- (जी.एस.टी सह) **मुलाखत परीक्षा** : बँकेमार्फत मुलाखत घेऊन निवड करण्यात येईल.

तरी वरील पदांकरीता पात्रता धारण करणाऱ्या इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज पुर्ण माहिती (सी.व्ही.) व ई-मेल ॲड्रेससह पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक्स् असोसिएशन पुणे यांच्या pba.recruit.bnsb@gmail.com या पत्त्यावर जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून **१५ दिवसात** ऑनलाईन पाठवावेत. अर्जाचा फॉर्म असोसिएशनच्या punebankasso.com वेबसाईटवर उपलब्ध आहे. **सदर फॉर्ममध्येच अर्ज करावेत.** अर्जासोबत परीक्षा शुल्क न पाठविणाऱ्या अथवा मुदतीनंतर आलेल्या अथवा अपुर्ण अर्जाचा विचार केला जाणार नाही. लेखीपरीक्षा **ऑफलाईन पध्दतीने पुणे** येथे घेण्यात येईल. परीक्षेचे ठिकाण व दिनांक, परीक्षेचे स्वरुप इ. बाबतची माहिती पात्र उमेदवारांना ई-मेल वर स्वतंत्रपणे कळविण्यात येईल. अर्जासोबत (ना परतावा तत्वावर) पाठवावयाचे शुल्क (जी.एस.टी सह) असोसिएशनच्या खालील खात्यावर NEFT ने जमा करावे व शुल्क जमा केल्याची पावती उमेदवाराचे नाव नमुद करुन अर्जासोबत मेलवर पाठवावी.

| |
|---|
| असोसिएशनच्या खात्याचा तपशील : Cosmos Co-operative Bank Ltd., Parvati darshan Br. Saving A/C. No.0010501028653, IFS Code : COSB0000001 |